| CBSE X<br><br>Date : | **MT EDUCARE LTD.**<br>SUBJECT : MARATHI<br>**SEMI PRELIM - I**<br>**MODEL ANSWER PAPER** | Marks : 80<br><br>Time : 3 hrs. |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | **खण्ड : 'क'** | |
| **A.1.** | | |
| १. | स्त्रीलिंग | **1** |
| २. | 'चांगली सोबत : एक गरज' हे शीर्षक वरील उताऱ्याला योग्य आहे. | **1** |
| ३. | जोड्या लावा | |
| | अ) परिसर = सभोवतालची जागा | **1** |
| | ब) उणिवा = कमतरता | **1** |
| ४. | वरील उताऱ्यात सोबतीचे महत्त्व सांगितले आहे. चांगली मैत्री म्हणजे सोबत असते. मानसिक आणि भावनिक संवाद साधण्याचे ते एक चांगले ठिकाण असते. चांगली सोबत हे आपल्या व्यक्तिमत्त्वाचे एक रूप असते. आपल्यामधल्या अनेक उणिवा तिथे पूर्ण झालेल्या असतात. आपण ज्याठिकाणी राहतो तो परिसर, आजूबाजूचा निसर्ग, माणसे, प्राणी, वस्तू यांचा रोज आपल्याशी संबंध येत असतो. त्यांची रोजची सोबत असते. त्यांतले कोणी दिसेनासे झाले तर आपण बेचैन होऊन जातो. या सगळ्यांचे महत्त्व तसे जाणवत नाही पण त्यांची आवश्यकता मात्र फार मोठी असते. | **3** |
| **A.2.** | | |
| १. | दोन | **1** |
| २. | मला परीक्षेत ९९% गुण मिळाले या आनंदात मला आकाश ठेंगणे वाटू लागले. | **1** |
| ३. | अमेरिकेतील नाईण्टीनाईन असोसिएशनच्या महिला सदस्या यांच्याशी सौदामिनीची मैत्री जडली. त्यांनी सौदामिनी यांची विमानउड्डाण अनुभव घेण्यासंबंधीची अडचण जाणून घेतली. तसेच तिला त्यासंबंधी शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेत येण्याचे आमंत्रण दिले. | **2** |
| ४. | सौदामिनी आठ महिन्यांची बिनपगारी रजा घेऊन व बँकेचे कर्ज काढून अमेरिकेत गेल्या. तिथे जाऊन त्यांनी एकूण ३०० तासांचा हवाई उड्डाणाचा अनुभव घेतला. तसेच त्यासंबंधातील निरनिराळे पाच परवाने मिळवून भारतात परतल्या. | **2** |
| | **खण्ड : 'ख'** | |
| **A.3.** | **खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.** | |
| १. | **मी पंतप्रधान झालो तर ....**<br>आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव खूप गाजत आहे. माहिती तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, खेळ इ. क्षेत्रात भारताची दखल घ्यावी अशी कामगिरी होत आहे. परंतु स्थानिक पातळीवर हे चित्र फारसे चांगले नाही. सर्वत्र भ्रष्टाचार, अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या चालू आहेत. | **8** |

राजकीय क्षेत्रात तर खूपच गोंधळ आहे. हे सर्व पाहून खूप संताप येतो. हे काय चाललय आपल्या देशात? असे प्रश्न मनात निर्माण होतात. आपल्या देशाच्या उज्ज्वल परंपरेचे काय होणार? अशा वेळी वाटू लागतं मी पंतप्रधान व्हायला हवं. खरंच, मी पंतप्रधान झालो तर ....

आपल्या देशात लोकशाही आहे असे म्हटले जाते. पण त्याचा खरा अर्थच आपल्याला समजलेला नाही आणि म्हणूनच ''लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही !''. हे मी त्यांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करीन. आपण सारे समान आहोत हा त्यांना विश्वास देईन. आपल्या देशातील जनतेला मी साक्षर बनवेन कारण साक्षरतेमुळेच देशातील समस्यांवर मात करता येईल. आपल्या समाजात अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात पसरलेली आहे. धर्माच्या नावाखाली आज अनेक अघोरी कृत्ये केली जातात. लोकांवर अत्याचार केला जातो. मी पंतप्रधान झालो तर या सर्व समस्यांच्या मुळाशी जाईन आणि त्या नष्ट करण्याचा प्रयत्न करीन.

आपला भारत देश शेतीप्रधान आहे. इथला शेतकरी समृद्ध होईल, तो कधीही आत्महत्या करणार नाही अशी सरकारी धोरणे मी आखेन. त्यांना सवलती देईन. आधुनिक तंत्रज्ञान, खते, उपलब्ध करून देईन. तळागाळातील लोकांना अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी मिळतात की नाही याकडे लक्ष देईन.

वाढत्या लोकसंख्येमुळे आपल्याला समृद्धीची फळे चाखता येत नाहीत. मी पंतप्रधान झालो तर लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी जनतेला जागरूक करेन. गोरगरिबांना सवलतीमध्ये वैद्यकीय सेवा मिळवून देईन.

गरीब आणि श्रीमंत हा भेदभाव नष्ट करून सर्वत्र समानता, सुख, आरोग्य, शांतता, प्रगती अशा गोष्टी निर्माण करून या पृथ्वीवरील मानवी जीवन सुसह्य करण्याचा मी प्रयत्न करेन. हे सर्व करताना मला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. तरीही न घाबरता मी या देशात 'सुराज्य' निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मनापासून करेन.

पण हे सगळं स्वप्न सत्यात उतरवण्याकरता मी अजून खूप लहान आहे याची मला कल्पना आहे आणि म्हणूनच मी शिक्षण घेणार. शिक्षणाने सामर्थ्यवान झाल्यावर मी देश चालवण्याचे कार्य हाती घेणार. द्याल ना मला आशीर्वाद माझ्या मनासारखा भारत घडविण्यासाठी.

'स्वप्नातल्या माझ्या विचारांनो
तुम्हास बळ देईन मी माझ्या कृतीचे
ध्येयवादी पाखरू मी, या नभांगणी
मिळो मजला समाधान स्वप्नपूर्तीचे'

२. **श्रमाचे महत्त्व** ४

नसे राऊळी वा नसे मंदिरी
जिथे राबती हात तेथे हरी

नेपोलियनने म्हटल्याप्रमाणे, "The word impossible is only in the dictionary of fools". अशक्य हा शब्द केवळ मूर्खांच्याच शब्दकोशात आढळतो असे म्हटले जाते. हे नेपोलियनचे विधान अगदी खरे आहे. जर आपल्याला आयुष्यात कोणतीही गोष्ट मिळवायची तर श्रम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

श्रमाने आपण जगातील कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो 'केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे'. धन, विद्या, किर्ती या गोष्टी श्रमाने प्राप्त होतात.

प्रसिद्ध कवी मोरोपंत आपल्या आर्येत म्हणतात, ''घनांबु न पडे मुखी उघडल्याविना पाखरे'' म्हणजे पाखरांना सुद्धा तोंड उघडल्याशिवाय पाण्याचा थेंब मिळत नाही. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असे म्हणून नुसते बसून राहणाऱ्यांचा कधीच उद्धार होत नाही. आळस हा माणसाचा शत्रू आहे. या आळशीपणानेच आपल्या प्रगतीत बाधा येते.

आपल्याला आपल्या जीवनातील इच्छा, आकांक्षा, ध्येय पूर्ण करायच्या असतील तर श्रमाशिवाय पर्याय नाही. अशा श्रमानेच आज जगात अनेक व्यक्ती थोर पदाला पोहोचल्या आहेत. कर्वे, फुले, आगरकर यांनी कष्ट करून, धीर न सोडता, लोकांचा विरोध पचवून स्त्री शिक्षणाचे कार्य चालू ठेवले. म्हणून त्यांच्या या प्रयत्नांनीच आजच्या स्त्रीने अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणासाठी खूप कष्ट उपसले. आपल्या देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी फार मोठ्या कष्टांनी स्वातंत्र्य मिळवले. माहुली गावाचा एक अडाणी, गरीब मुलगा राम हा काशीला गेला व आपल्या श्रमाच्या जोरावर तो 'रामशास्त्री प्रभुणे' झाला.

दुसऱ्या महायुद्धात जपान पूर्ण बेचिराख झाला. पण जपानी माणूस डगमगला नाही. स्वतःच्या देशाला पुन्हा उभे करण्यासाठी त्यांनी घाम गाळला, अहोरात्र कष्ट केले व आपल्या प्रयत्नांच्या जोरावर काही काळातच जपानसारखे राष्ट्र अमेरिकेच्या तोडीस तोड बनले.

मज नकोत अश्रू, घाम हवा ।
हा नव्या युगाचा मंत्र नवा ।।

मानवाने दगडावर दगड घासून अग्नी निर्माण करण्यापासून ते आज संगणकापर्यंत प्रगतीचा प्रवास केला तो श्रमाच्या जोरावरच. आजचे युग विज्ञान युग आहे. गॅलिलिओ, कोपरनिकस, एडिसन, होमी भाभा अशा शास्त्रज्ञांनी अतिशय कष्ट सोसून अडचणीवर मात करून अनेक शोध लावले आणि म्हणूनच आजचा मानव मंगळावर वस्ती करण्याची योजना करत आहे.

कवी माधव ज्यूलियन यांनी म्हटल्याप्रमाणे, 'थांबला तो संपला'. जो श्रम करत नाही, प्रयत्न करत नाही त्याची कधीही प्रगती होत नाही. आजच्या स्पर्धायुगात आपला भविष्यकाळ उज्ज्वल बनवण्यासाठी वर्तमानात श्रम करणे अतिशय गरजेचे आहे. म्हणूनच कवींनी म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते ....

''कष्ट करा रे कष्टापोटी,
फळे असती रसाळ गोमटी''

३. **फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त** **8**

'मी एक फाटके पुस्तक बोलतोय. अडगळीच्या कोपऱ्यात धूळ खात पडलेलं, प्रत्येक पानाची शिवण उसवून मुखपृष्ठासह फाटलेलं. तुम्हा माणसांची तऱ्हाच न्यारी आहे. आपलं काम झालं की, त्या वस्तूला दूर सारता. आजचं युग संगणकाचं आणि ई-मेलचं युग आहे. हल्ली तर काय म्हणे तुम्ही पुस्तकंसुद्धा संगणकावरच वाचता. हा झाला आजचा काळ, पण तो काळ मी कसा विसरू. त्यावेळेस गदिमा, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, बालकवी, वि.स.खांडेकर यांच्यासारख्या दिग्गज लेखकांच्या शब्दांचा

साज आमच्या अंगावर चढायचा. अंगावर मोरपिस फिरावं तसं वाचकाचं बोट माझ्या पानापानावरून फिरत असे.'

'अगदी ज्ञानोबा माऊलीपासून ते काल परवाच्या तुमच्या चंद्रशेखर गोखल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आमचाच आधार घेतला. तुमच्या जीवनाच्या प्रत्येक जडणघडणीत आम्हीच मोलाचा वाटा उचलला. एक काळ असा होता की, साहित्य विश्वाचे दूत म्हणून आम्ही जगभर अभिमानाने मिरवलो. इंग्रजांच्या काळातसुद्धा तुरूंगातील मान्यवरांचे विचार तुरूंगाबाहेर आम्हीच पोहोचवले.'

'मन दु:खी किंवा अस्वस्थ झाल्यास आमचीच साथ धरली जात होती. त्याकाळी खरंच साहित्याची गंगा घरोघरी वाहत होती. दर्जेदार लेखकांबरोबर जाणकार वाचकही त्याकाळी असायचे आणि आमच्यासारख्या पुस्तकावरसुद्धा 'परिसंवाद' घडायचे. तत्वज्ञानाचा आधार घेऊन मनाला स्थैर्य आणण्याचा प्रयत्न व्हायचा. विनोदाची शाल पांघरून वाचक मनोमनी हसायचा. सामाजिक, राजकीय, क्रीडा इ. सर्व क्षेत्रात आमची मुशाफिरी होती. पुस्तक बाजारात येण्याआधी नोंदणी होण्याइतपत आमची दादागिरी होती. दिवाळी अंकावर वाचकांच्या उड्या पडायच्या. जेव्हा विविध संकटे वाट्याला यायची तेव्हा स्वत:ला सावरण्यासाठी वाचकांची पावले नकळत आमच्याकडे वळायची. घरात बसल्या बसल्या आम्ही तुम्हाला परदेश सफर घडवून आणायचो. भरकटलेल्या तरूणांना योग्य दिशासुद्धा आम्हीच दाखवायचो. आयुष्याच्या प्रत्येक चढउतारावर, प्रत्येक वळणावर आम्हीच तुमचे मार्गदर्शक होतो.'

'माझ्या पानांचे कित्येक कोपरे आजही दुमडलेले आहेत. तुम्ही वाचता वाचता इथे थांबला होतात, हे तुम्हाला सांगण्यासाठी. उराशी मी आजही तो सुकलेला गुलाब जपून ठेवलाय. कुणालातरी, कुणाची तरी आठवण म्हणून. भले तुम्ही आम्हाला अडगळीचा कोपरा दाखवला असेल, पण या जीर्ण अवस्थेतही माझ्याकडे आहे बरेच काही तुम्हाला देण्यासारखे.'

काल परवा तो टी.व्ही. काय आला आणि तुम्ही आम्हाला विसरलात. घरभर पुस्तकांचे रकाने अभिमानाने सजवणारे तुम्ही, अचानक आमच्यापासून दूर गेलात. काय तर म्हणे, पुस्तक वाचण्यात वेळ जातो, कंटाळा येतो. तुमचं वाचनच कमी झालंय, तुमचे शब्दसामर्थ्य कमी पडते. दोन-तीन मराठी शब्दांनंतर इंग्रजीचा आधार घ्यावा लागतो. तुम्ही जर पुस्तके वाचत असता तर निश्चितच तुमच्याकडेही अमाप शब्द संपत्ती असती आणि शब्दांची वानवा भासली नसती.'

'मी आता फारच थकलोय. जीर्ण झालेल्या पानांसकट माझी कधी होळी होईल, हे सांगता येत नाही. परंतु तुम्हा सर्वांना सांगून जातो, 'वाचाल तर वाचाल'. पुस्तक संस्कृती पुन्हा येऊ द्या, आमच्यासारख्या अडगळीत पडलेल्या फाटक्या पुस्तकांना पुन्हा सुगीचे दिवस पाहू द्या.'

**A.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

सुजित काळे<br>
विद्यार्थी प्रतिनिधी,<br>
ज्ञानदिप विद्यालय,<br>
भांडूप (पूर्व).<br>
दि.५ जून, २०१७

प्रति,
मा. विभागीय अधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

<u>विषय – शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याकारणाने तक्रार पत्र.</u>

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी, ज्ञानदिप विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणास पत्र लिहित आहे. आमच्या शाळेसमोरील रस्ता गेले दोन महिने अतिशय खराब स्थितीत आहे. बऱ्याच वेळा तक्रार करूनही त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. आता ऐन पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यात बरेच पाणी साचत आहे. त्यामुळे रस्त्यावर चालणेच त्रासाचे आहे.

येथे वाहनांची कोंडी होत आहे. विशेष करून शाळा सुटण्याच्या वेळेस फारच गर्दी होते. शिवाय खड्ड्यात पाणी तसेच साचून राहिल्याने तेथे कचरा, घाण जमा होऊन दुर्गंधी व मच्छर यांचा त्रास वाढला आहे. रहदारीची कोंडी झाल्यामुळे सतत गाड्यांचे हॉर्न वाजत असतात.

तरी कृपया या तक्रारीकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नम्र,
सुजित काळे
(विद्यार्थी प्रतिनिधी)

तिकीट

प्रति,
मा.विभागीय अधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

प्रेषक,
सुजित काळे
विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानदीप विद्यालय,
भांडूप (पूर्व).

**किंवा**

५

समीर देशमुख
सेनापती मार्ग,
पुणे.
दि.१० जून, २०१७

प्रति,
मा. व्यवस्थापक,
मुलुंड स्पोर्टस्,
मुलुंड, मुंबई -८०.

विषय – खेळाचे साहित्य मागविण्याबाबत पत्र.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मला स्वत:साठी खालील खेळाचे साहित्य हवे आहे. तरी खालील साहित्य घरपोच पाठवावे. सोबत आपल्या साहित्यांचे बिल पाठवावे. जेणेकरून लगेच रक्कम पाठवून देता येईल.

**साहित्यांची यादी**

| क्र. | खेळाचे साहित्य | नग |
|---|---|---|
| १) | कॅरम बोर्ड व सोंगट्यांचा संच | १ |
| २) | क्रिकेट संच (बॅट,बॉल,स्टंप) | ४ |
| ३) | टेबल टेनिसचा संच | ३ |

कृपया वरील खेळाचे साहित्य त्वरीत पाठवावे. साहित्यांच्या किंमतीवर शक्य ती सवलत मिळावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
समीर देशमुख

तिकीट

प्रति,
मा.व्यवस्थापक,
मुलुंड स्पोटर्स,
मुलुंड, मुंबई - ८०.

प्रेषक,
समीर देशमुख
सेनापती मार्ग,
पुणे.

**किंवा**

**खालील विषयावर संवाद लेखन करा .**

**(कट्ट्यावर बसलेले मित्र)** 5

**पेंडसे :** अरे ऐकलंत का ? बाजूच्या सोसायटीमधला तो अरुण होता ना, तो गेला रे. परवा हायवेला अपघात झाला. त्याच्या डोक्याला चांगलाच मार लागला. सुश्रुत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट पण होता. पण रक्त मिळाले. नाही ऑपरेशच्या वेळी म्हणून गेला रे.

**जाधव :** अरे हो रे. एकुलता एक होता. त्याची आई तर वेडी व्हायचीच बाकी आहे.

**गावडे :** आता गेलेल्याला आपण परत नाही आणू शकत. पण पुढे अशा प्रसंगांच्या वेळी रक्त कमी पडू नये म्हणून आपण आपल्याकडून मदत करू शकतो. रक्तदान शिबिरच आयोजित करूयात का आपण ?

**मांजरेकर :** हो हो. चालेल. मी सेक्रेटरीकडून परवानगी काढतो आणि आपल्या गणपती मित्रमंडळाकडूनही काही मदत मिळते का बघतो.

**पेंडसे :** चालेल तर. येत्या रविवारी आपण आपल्या सोसायटीत रक्तदान शिबिर आयोजित करुया. त्याच्या प्रचाराचं काम मी आणि जाधव बघतो.

**गावडे :** मी टाटा हॉस्पिटलमध्ये संपर्क करतो. तेथे माझी ओळख आहे. अशा शिबिरासाठी ते नेहमीच तयार असतात.

**मांजरेकर :** मी रक्तदानानंतर त्या लोकांना नाष्टा आणि त्यांच्या सत्काराची तयारी करतो.

**शिगवण :** मी आपल्या सोसायटीजवळच्या पोलीस स्टेशनकडे एक अर्ज देतो.

**जाधव :** चालेल तर. या रविवारी आपल्या सोसायटीत आपण अरुणला श्रध्दांजली म्हणून रक्तदान शिबिर आयोजित करू.

**सर्वजण :** (तयारीनिशी) हो..हो.. चालेल..

## खंड 'ग'

**A.5.** **अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा.**

| | | |
|---|---|---|
| १. | **क्रियाविशेषण अव्यय** - परवा | 1 |
| २. | **पण** - उभयान्वयी अव्यय | 1 |
| ३. | **मिळवलेस** - क्रियापद | 1 |
| ४. | त्यांना पन्हं नेऊन देशील का ? | 1 |
| ५. | किती रंगबिरंगी आहेत ही चित्रं ! | 1 |

**A.5.** **आ) प्रयोग ओळखा.**

| | | |
|---|---|---|
| १. | विजारपूरचा आदिलशहा दरगाह उभारतो. | 1 |
| २. | बाबूजींनी घराची वाट धरली. | 1 |
| ३. | बाबूजींनी मुलांना काही कमी पडू दिले नाही. | 1 |

**A.5.** **इ) काळ ओळखा.**

| | | |
|---|---|---|
| १. | भूतकाळ | 1 |
| २. | वर्तमानकाळ | 1 |

| | | |
|---|---|---|
| **A.5.** | **ई) लेखन नियमांनुसार वाक्य शुदध करून लिहा.** | |
| १. | त्यांची **कविता** तेरावी, चौदावीची मुलं **अभ्यासत** होती. | 1 |
| २. | **चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाचे** प्रमाण कमी झालेलं दिसतं. | 1 |
| **A.5.** | उ) **लिंग बदला.** | |
| | १. कवयित्री - कवी      २. मांजर - बोका | 1 |
| **A.5.** | ऊ) **वचन बदला.** | |
| | १. वर्तमानपत्र - वर्तमानपत्रे      २. हत्ती - हत्ती | 1 |
| **A.5.** | ए) **समानार्थी शब्द लिहा.** | |
| | १. आकाश - नभ, गगन      २. पाय - पद, पाऊल | 1 |
| **A.5.** | ऐ) **विरूद्धार्थी शब्द लिहा.** | |
| | १. पहिला × शेवटचा      २. विश्वास × अविश्वास | 1 |
| **A.5.** | **ओ) पुढील वाक्यात कंसातील योग्य वाक्प्रचार वापरुन वाक्य पुन्हा लिहा.** | |
| १. | दहावीच्या निकालाची विद्यार्थ्यांना खूप **उत्कंठा लागली होती.** | 1 |
| २. | स्वामीजींना निरोप देताना रविवर्म्याचे **मन भरून आले.** | 1 |
| | **खंड 'घ'** | |
| **A.6.** | **अ) खालील वाक्यांचे संदर्भ देऊन स्पष्टीकरण करा : (कोणतेही एक)** | |
| १. | **संदर्भ :** वरील वाक्य 'अपूर्व भेट' या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठाचे लेखक रणजित देसाई आहेत. स्वामी विवेकानंदांनी स्वतःच्या जीवनातील तत्त्वे सांगताना वरील विधान केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** स्वामी विवेकानंद म्हणजे एक महान विचारवंत होते. महान तत्वज्ञानी होते. त्यांचा हिंदू धर्माबद्दलचा अभ्यास खूप सखोल होता. त्यांनी हिंदू धर्माबद्दल भारतात आणि परदेशात खूप व्याख्याने दिली होती. परंतु चित्रकलेचे खरे राजा राजा रविवर्मा यांनी याच हिंदू धर्माची दैवते चित्रांच्या रूपाने घरोघरी पोहोचवली होती. स्वामी विवेकानंद शिकागोहून परत आले त्या दिवसापासून त्यांना राजा रविवर्म्यांच्या भेटीची ओढ लागली होती. पण कोणाही परक्या माणसाच्या घरी न कळवता जाणे हा स्वामींचा स्वभावधर्म नव्हता. परंतु, राजा रविवर्म्याबद्दल आपलेपणा, प्रेम जाणवल्यामुळे त्यांचे कौतुक आणि अभिनंदन करण्यासाठी स्वामीजी त्यांच्या घरी अनाहूतपणे गेले होते.<br>**वैशिष्ट्य :** स्वामी विवेकानंद यांची राजा रविवर्म्याबद्दलची आपुलकीची भावना येथे दिसून येते. | 4 |
| २. | **संदर्भ :** वरील वाक्य 'हिमालय' या पाठातून घेण्यात आले आहे या पाठाचे लेखक 'प्रभाकर पेंढारकर' आहेत. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे. | 4 |

**स्पष्टीकरण :** लेखक हिमालयात असताना एकदा पावसाच्या थेंबांचा आवाज सोडला तर रात्रीच्या वेळी सारंच शांत होतं. हिमशिखरावर रेंगाळणारे ढग खाली उतरले होते. त्यामुळे दूरवरचा किन्नोर कैलास, बलदंड देहाचा रारंग ढांग आणि त्याला विळखा घालून वाहणारी सतलज नदी या सर्वच गोष्टींचं अस्तित्व हरवून गेलं होतं. हे सगळचं अंधारात दिसेनासं झालं होतं. तशातच लेखक टेबलावरच्या कंदिलाच्या प्रकाशात कागद आणि पेन घेऊन लिहिण्यासाठी बसले होते. त्यामुळे अस्तित्व उरलं होतं ते केवळ एवढ्याच गोष्टींचं. त्यामुळे लेखकाला एकांतवास जाणवू लागला होता. पण या एकांतवासातही लेखक कागद व पेनाच्या माध्यमातून संवाद साधत होता. हिमालय, किन्नोर कैलास, रारंग ढांग या सर्वांबद्दल तो वाचकांशी एकप्रकारे गप्पाच मारत होता. म्हणूनच लेखकाने वरील विधान केले आहे.
**वैशिष्ट्य :** माणूस समाजशील प्राणी आहे, तो एकटा कुठेही राहू शकत नाही हे येथे दिसून येते.

३. **संदर्भ :** वरील वाक्य 'संवाद, विसंवाद' या पाठातून घेतले आहे. या पाठाच्या लेखिका 'शांता शेळके' आहेत. सुपर मार्केटमधील अमेरिकन तरुणी संदर्भातला अनुभव व्यक्त करताना वरील विधान केले आहे. **4**

**स्पष्टीकरण :** लेखिकेला मातृत्त्वाबद्दल अतिशय सुंदर अनुभव परदेशात अनुभवायला मिळाला. लेखिकेला अमेरिकेत सुपरमार्केटमध्ये एक अमेरिकन तरुणी भेटली. बाबागाडीतली तिची छोटी मुलगी खूपच गोड होती. न राहवल्यामुळे लेखिकेने तिचे कौतुक केले व तिच्या आईलाही ते कौतुक फार आवडले. पुढे जवळजवळ घटकाभर त्या दोघीही मुलांविषयी गप्पा मारत बसल्या. या गप्पातून लेखिकेला जाणवले की, भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखेच प्रिय असते. याचाच अर्थ असा की, मातृत्व जगामध्ये सर्वत्र समान असते.
**वैशिष्ट्य :** मातृत्त्वाचे लेखिकेने केलेले वर्णन येथे योग्य वाटते.

**A.6.** **आ) योग्य पर्याय शोधून विधान पूर्ण करा.** **1**

१. **<u>सूतकताई</u>** हे उत्पादक, शारीरिक परिश्रमाचे प्रतीक मानले जात असे.

**A.7.** **अ) खालील प्रश्नांची उत्तरे सुमारे ५०-६० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)**

१. सुर्वे यांच्या कवितांची पहिली श्रोता कृष्णाबाईच असायच्या. कविता लिहून झाली की सुर्वे ती कविता लेखिकेला वाचून दाखवायचे. सुर्वे कविता लिहितात याचा आनंद लेखिकेलाही व्हायचा. पण तो आनंद कसा व्यक्त करायचा, हे त्यांना समजत नसे. अनेकदा संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द त्यांच्या कानावर पडायचे, पण त्यातला भाव लेखिकेला समजायचाच नाही. कारण त्यांचे स्वत:चे मन त्यांना सांगायचे की कृष्णाबाई तुला काही कळतंय का त्यातलं ? कारण एक तर तू अडाणी बाई आहेस ? तुला काही समजणार नाही आणि बावळटासारखं उगाच काहीतरी बोलून स्वत:चं हसू करून घेशील. **4**

अशाप्रकारे कृष्णाबाई स्वत:च्या न्यूनगंडामुळेच गप्प बसायच्या. म्हणूनच त्या म्हणतात, 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे.'

| | | |
|---|---|---|
| २. | आनंदोत्सवात जातीपातीचे, धर्माचे अडसर पार करताना आपण काही मर्यादा पाळावयाच्या आहेत कारण आजकाल लग्नांच्या वराती, भाद्रपदातला पारंपरिक गणेशोत्सव, शिवाय माघातली गणेशजयंती, महाशिवरात्र, दिवाळी, नवरात्र असे उत्सव शहाण्या माणसाला वेड लागेल अशी परिस्थिती निर्माण करतात. अशावेळी असे आनंदोत्सव साजरे करताना त्या उत्सवाचा आवाज आणि गर्दी यामुळे कोणाला त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. या गर्दीची रस्त्यावरच्या रहदारीला अजिबात अडचण होणार नाही इतके त्या समारंभाचे स्वरूप विकेंद्रित असायला हवे. या उत्सवाचे विकेंद्रीकरण करून आपापल्या घरात, अंगणात, सोसायटीत किंवा समाजमंदिरात ते साजरे केले पाहिजेत. पण तेथे या आनंदाची उधळमाधळ सांडलवंड अजिबात होऊ नये, असे लेखिकेला वाटते.<br>अशाप्रकारे आनंदोत्सव साजरे करताना वरील मर्यादा आपा पाळणे आवश्यक आहे, असे लेखिकेला वाटते. | 4 |
| ३. | निसर्ग सौंदर्य अनुभवायचे असेल तर केवळ त्याचे फोटो काढून पाहिले तर उपयोग नसतो. फोटोवरून त्याची कल्पना येणे शक्य नसते. म्हणूनच लेखकाच्या मते निसर्गचित्र म्हणजे केवळ निसर्गदृश्य नसते. निसर्गाशी संवाद साधला तर निसर्ग आपणहून आपल्याशी बोलतो. नदीच्या प्रवाहाचा सतत चाललेला आवाज, पर्वतावरचा दगड त्या ओघात पडल्यावर उसळणाऱ्या पाण्याचा आवाज, पहाटेच्या वेळी पक्ष्यांची किलबिल, रात्री रातकिड्यांची किरकिर, मेघांचा गडगडाट, क्षणात चमकून जाणाऱ्या विजेचा कडकडाट, कधी वाऱ्याची भणभण तर कधी नुसतीच पानांची सळसळ हे सारे निसर्गाशी संवाद साधल्यावरच अनुभवायला मिळते.<br>अशाप्रकारे निसर्गाची वेगळी भाषा, त्याचे विविध शब्द अनुभवण्यासाठी निसर्गाशी संवाद साधायलाच हवा, असे लेखक म्हणतात. | 4 |
| ४. | राजा रविवर्मा स्वामीजींच्या आगमनाने अत्यंत आनंदित झाले. स्वामीजींचे अलौकिक तेज व त्यांचे व्यक्तिमत्त्व यांनी रविवर्मा भारावले होते. स्वामीजींची हिंदू धर्माबद्दलची व्याख्याने देशात, परदेशात प्रसिद्ध झाली होती. तसेच राजा रविवर्मादेखील आपल्या चित्रकलेत विश्वविख्यात होते. त्यांनी हिंदू धर्माची दैवते घरोघरी पोहोचवली होती. अशाप्रकारे दोघांनी आपल्या कलेतून आणि व्याख्यानातून हिंदू धर्म देशात, परदेशात व घराघरात पोहोचवला. दोघेही आपआपल्या ठिकाणी प्रतिभावंत असूनदेखील दोघांच्या ठिकाणी असलेला कलेबद्दलचा आदर, हिंदू धर्माबद्दल असलेली जाणीव व स्वभावातील नम्रपणा, आपुलकी आपणास पाहावयास मिळते. म्हणूनच लेखकाने स्वामी विवेकानंद व रविवर्मा यांच्या भेटीला 'अपूर्व भेट' असे म्हटले आहे. | 4 |
| **Q.7.** | **आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** | |
| १. | मित्रांशी बोलताना मतभेदाचे अवघड विषय आपण टाळतो. | 1 |
| २. | लेखिकेस ऋतुबदलाचा आनंद मित्रमैत्रिणींबरोबर एकत्रितपणे साजरा करावासा वाटतो. | 1 |

| | | |
|---|---|---|
| **Q.8.** | **अ) खालील पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | **संदर्भ :** वरील ओळी 'कृपा करीं पंढरीनाथा' या अभंगातून घेतल्या आहेत. 'संत नरहरी सोनार' यांनी हा अभंग लिहिला आहे. येथे भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला असून आपल्या अपराधांना क्षमा करण्याची विनंती केली आहे.<br>**स्पष्टीकरण :** विठ्ठलाचे गुणवर्णन संत नरहरी सोनार मनापासून करतात. ते म्हणतात की हे पंढरीनाथा, आम्हा भक्तांवर तू नेहमीच कृपा कर. गोरगरिबांची मदत करणारा, त्यांच्या अडीअडचणींच्या वेळी धावून जाणारा तू दीनानाथ आहेस. हे दीनांच्या नाथा तूच सर्वशक्तिमान, समर्थ आहेस. जीवन जगत असताना आमच्याकडून अनेक चुका होतात. अनेक अपराध घडतात. तू आमच्या अपराधांना क्षमा कर. हे पंढरीनाथा, तुझा महिमा अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो आम्हांला कळत नाही, समजत नाही.<br>**वैशिष्ट्य :** अतिशय सुंदर शब्दांत विठ्ठलाचा मोठेपणा संत नरहरी सोनारांनी येथे व्यक्त केला आहे. | 4 |
| २. | **संदर्भ :** वरील ओळी 'माझ्या घरट्यात' या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी 'सूर्यकांत खांडेकर' आहेत. येथे भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा विचार मांडला आहे.<br>**स्पष्टीकरण :** कवीच्या घरात चांदरातीचे मोहोळ नाही म्हणजे श्रीमंतीचा, वैभवाचा झगमगाट नाही. कुठल्याही भौतिक वस्तूंवर सुख व आनंद अवलंबून नाही. साधेपणातला आनंद कवीच्या घरट्यात सर्वत्र पसरला आहे. त्यात सगळे समाधानी आहे. सकाळच्या कोवळ्या किरणांसारखा सुखद, शालीन उबदारपणा येथे जाणवतो. घराचे नैसर्गिक घरपण व साधेपणाच्या रविकिरणांनी कवीचे घरटे उजळून निघाले.<br>**वैशिष्ट्य :** येथे कवीचे वास्तववादी विचार दिसून येतात. | 4 |
| ३. | **संदर्भ :** वरील ओळी 'आजि सोनियाचा दिवस' या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. 'संत सेना महाराज' यांनी हा अभंग लिहिला आहे. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन येथे केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला. त्यांच्या मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला. दिवाळी-दसरा आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला. थोडक्यात संतांचे आगमन म्हणजेच सेना महाराजांसाठी दिवाळी-दसरा आहे.<br>**वैशिष्ट्य :** येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते. | 4 |
| **Q.8.** | **आ) खाली दिलेल्या पद्यपंक्तीतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून ती पद्यपंक्ती पुन्हा लिहा :** | |
| १. | असे <u>**विश्वकर्मा**</u> श्रमांचा पुजारी ! | 1 |

| | | |
|---|---|---|
| Q.9. | अ) **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** | |
| १. | समाजातील चालीरिती, रूढी, जातीव्यवस्था इ. गोष्टींमुळे माणूस आपले माणूसपण हरवत चालला आहे. त्यामुळे कवी अस्वस्थ होतो. अशावेळी कवीला वाटते की, समाजामध्ये खूप मोठा प्रलय व्हावा. ज्यायोगे स्वार्थाने, मी पणाने भरलेली घरे व शहरे म्हणजेच स्वार्थी सामाजिक समूह नष्ट व्हावेत. त्या जागेवर एकाच आकाराची, विचाराची, उंचीची भेदाभेदरहित घरे व शहरे निर्माण व्हावीत. माणसाचे विचार समाजातील जुन्या वाईट विचारांना धरून पुढे जात आहेत. त्यामुळे असा प्रलय व्हावा की विचारांचे प्रवाह बदलावेत आणि चांगल्या विचारांच्या झऱ्यांनी तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी. त्यामुळे समाजातील विषमता नष्ट होईल व समानता निर्माण होईल. त्याचप्रमाणे 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण होईल. समाजात सकारात्मक बदल होऊन मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध येईल.<br>अशाप्रकारे माणसालाही माणूस म्हणून किंमत प्राप्त व्हावी असा प्रलय कवीला अपेक्षित आहे. | 4 |
| २. | मृगजळ म्हणजे पाण्याचा आभास असतो. मृगजळ हे नेहमी फसवे असते. संसारातील सुखही असेच मृगजळासारखे असते. हे कळत असूनही माणसे संसारातच खरे सुख मानतात. मोहमायेतच ते अडकून पडतात. आकाशातील ढगांची सावली अस्थिर व क्षणभंगूर असते. तसेच संसारातील सुख हे क्षणभंगूर असते. माणसे मोक्षाचा विचार न करता स्वत:च्या सुखासाठी मी, माझे हा अहंकार बाळगतात. त्याचे मन नेहमीच पत्नी, मुले, धन यातच गुंतलेले असते. पण यातून मिळणारे सुख मृगजळाप्रमाणेच असते. या वासनारूपी मोहजालात अडकल्यामुळे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची कधीच सुटका होत नाही. शेवटी त्यांना मोक्ष मिळत नाही.<br>अशाप्रकारे संत सोयराबाई यांनी माणसाला मोहमायेत अडकवणाऱ्या संसाराची तुलना मृगजळाबरोबर केली आहे. | 4 |
| ३. | कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | 4 |
| ४. | संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस त्यांच्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते त्याचप्रमाणे संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दु:ख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे.<br>अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे. | 4 |

| | | |
|---|---|---|
| **Q.9.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १. | कवितेतील घरट्यात बालरवि-किरणांची प्रभावळ नाचते. | **1** |
| २. | संत नरहरी सोनार यांनी दीनानाथ विठ्ठलाला म्हटले आहे. | **1** |
| **Q.10.** | **अ) खालील पठित उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | बालपणात भूतकाळाची तमा नसते, भविष्याची चिंता नसते, कुठल्याही प्रकारची जबाबदारी नसते, प्रत्येक गोष्ट नवलाईची भासते. बालपण म्हणजे अवखळपणे वाहणारा निर्मळ झरा ! बालपण म्हणजे जीवनातील वसंत ऋतुचे आगमन. एक सकाळ ताजी, कोवळी, प्रसन्न ! बालपणी प्रत्येकजण निरागस असतो. विकारांनी त्याच्या मनात घर केलेले नसते.<br>आपण जर बालपणीचा निष्पापपणा निरागसपणा जोपासला तर प्रौढपणा आला म्हणून व बालपण गेले म्हणून हळहळणे होणार नाही. कारण बालपणाइतके रम्य काही नाही. | **4** |
| २. | आमच्या घरातील मी शेंडेफळ असल्यामुळे आजीचा सर्वात लाडका होतो. माझी आजी मला खूप जीव लावत असे. प्रेम करत, चांगले संस्कार देत असे. चांगली शिस्तही लावत असे. माझी आजी दररोज सकाळी लवकर उठायची व देवपूजा करायची. अर्थात ही शिस्त तिने मलाही लावलीय. ती नेहमीच मला स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत असे. तिला खोटं बोलण्याचा खूप राग यायचा. तिनेच मला नेहमी खरे बोलण्यास शिकवले. चोरी करणे हे पाप आहे असे ती नेहमी म्हणायची. आपण नेहमी इतरांना मदत करावी, कोणाचेही मन दुखावू नये, तिरस्कार करू नये, सर्वांशी मिळून मिसळून, सौजन्याने, नम्रपणाने वागावे यावर तिचा भर असायचा. माझ्या आजीचा आवाज मधूर होता. तिनेच मला गायन शिकवले. गायन, वाचन, नृत्य असे चांगले छंद जोपासण्यास तिनेच मला शिकविले. मोठ्यांचा आदर करण्यास शिकवले. अनेक महापुरूषांच्या छान-छान गोष्टी, चरित्रे सांगून तिने माझ्यावर नकळत चांगले संस्कार बिंबवले.<br>स्वतःच्या कृतीतून माझ्यावर अनेक संस्कार करणाऱ्या तसेच मला चांगले जीवन जगण्याची दिशा देणाऱ्या माझ्या आजीचे उपकार न फेडण्यासारखेच आहेत. अशा या संस्कारमूर्तीस शतशः प्रणाम ! | **4** |
| **Q.10.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | 'चलेजाव' आंदोलनात महाराष्ट्रातील 'सातारा ' जिल्हा आघाडीवर होता. | **1** |
| २. | भारतात जन्मलेले पहिले पुस्तक 'ऋग्वेद' हे आहे. | **1** |

❖❖❖❖